श्री. संदीप अशोक बिरंगळ, परिचर, प्रा. आ. कें. शिरसगाव, ता. नेवासा यांचा परिचर गट-ड या पदाचा राजीनामा मंजुर करणेबाबत.

जिल्हा परिषद अहिल्यानगर

सामान्य प्रशासन विभाग-१

जिल्हा परिषद आदेश क्रं.साप्रवि-१/आस्था-४/296/२०२५

अहिल्यानगर दिनांक- 23/०६/२०२५

वाचा:- १. उपायुक्त तथा सदस्य सचिव, शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी(TAIT) २०२२ समिती महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे-०१ यांचेकडील विनंती अर्ज जा.क्र.मरापप/बापवि/२०२३/५४० दि. ३१/०१/२०२३

२. वैद्यकीय अधिकारी ,प्रा. आ. कें. शिरसगाव, ता. नेवासा यांचेकडील पत्र जा. क्र. वशि/ आस्था/१४४/२०२५ दि. १६/०६/२०२५

३. कार्यालयीन आदेश जा. क्र. साप्रवि/आस्था-४/१९१/२०१५ दि. ०९/०२/२०१५

४. महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही-१०९२/१०३३/प्र.क्र.३३/९२/०८ दिनांक २ डिसेंबर १९९७

श्री. संदीप अशोक बिरंगळ, परिचर, प्रा. आ. कें. शिरसगाव, ता. नेवासा यांची संदर्भ क्र. १ अन्वये झालेल्या सरळसेवा परीक्षेनुसार शिक्षण सेवक या पदावर नियुक्ती झाली आहे. त्यांनी परिचर गट-ड या पदाचा राजीनामा दि.१६/०६/२०२५ रोजी दिला असुन संदर्भ क्रं. २ अन्वये राजीनामा मंजुरीस्तव या कार्यालयास सादर केला आहे.

श्री. संदीप अशोक बिरंगळ, परिचर यांची सरळसेवेने संदर्भ क्र. ३ अन्वये परिचर गट-ड या पदावर नियुक्ती झालेली आहे. श्री. बिरंगळ हे परिचर गट-ड या पदावर दि. २०/०२/२०१५ रोजी प्रा. आ. कें. शिरसगाव, ता. नेवासा येथे हजर झालेले आहेत. श्री. बिरंगळ यांची निवड शिक्षण सेवक या पदावर झाल्यामुळे त्यांनी परिचर गट-ड या पदाचा राजीनामा दि. १६/०६/२०२५ रोजी दिला असुन संदर्भ क्र. ४ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार त्यांनी एक महिन्याचे मुळवेतन रक्कम रु १९७००/- चलनाने भरलेबाबतची प्रत सादर केलेली आहे.

संदर्भ क्रं. ३ अन्वये श्री. बिरंगळ, परिचर यांचेकडेस कोणत्याही प्रकारचे शासकीय येणे प्रलंबित नसल्याने व कोणत्याही प्रकारची चौकशी प्रलंबित नसलेबाबतचा अहवाल प्राप्त झालेला आहे. त्यामुळे संदर्भ क्रं. २ चे विनंती अर्जानुसार मी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर संदर्भ क्रं. ४ चे शासन निर्णयातील तरतुदीनुसार मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन श्री. संदीप अशोक बिरंगळ, परिचर, प्रा. आ. कें. शिरसगाव, ता. नेवासा यांचा परिचर गट-ड या पदाचा राजीनामा दि. १६/०६/२०२५ पासुन कार्यालयीन वेळेनंतर मंजुर करीत आहे. तरी सदर आदेशाची नोंद संबधितांच्या मुळ सेवापुस्तकात घेण्यात यावी.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संगणकीय संकेतांक 202506230401l2 असा आहे.

आनंद भंडारी (भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,
श्री. संदीप अशोक बिरंगळ, परिचर
व्दारा व प्रत- गट विकास अधिकारी, पंचायत समिती नेवासा

२/- सदरचा आदेश श्री. बिरंगळ,परिचर यांना बजावुन दिनांकित स्वाक्षरीची प्रत तात्काळ सादर करावी. तसेच श्री बिरंगळ,परिचर यांचेकडेस कोणत्याही प्रकारची थकबाकी/येणेबाकी प्रलंबित नसल्याची खात्री करुन पर्यायी व्यवस्था करुन त्यांना कार्यमुक्त करावे.

प्रत- मुख्य लेखा व वित्त अधिकारी,जिल्हा परिषद अहिल्यानगर.
प्रत- निवड नस्ती

आनंद भंडारी (भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर